**परीक्षेचे नांव : सहायक प्राध्यापक, मराठी,** **परीक्षेचा दिनांक : 09 फेब्रुवारी, 2014**

**महाराष्ट्र शिक्षण सेवा (महाविद्यालयीन शाखा), गट -अ, चाळणी परीक्षा-2013**

**विषय : मराठी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक प्राध्यापक, मराठी, महाराष्ट्र शिक्षण सेवा (महाविद्यालयीन शाखा), गट -अ, चाळणी परीक्षा-२०१३ या चाळणी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. त्यासंदर्भात उमेदवारांनी अधिप्रमाणित (Authentic) स्पष्टीकरण / संदर्भ देऊन पाठविलेली लेखी निवेदने, तसेच तज्ज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन आयोगाने उत्तरतालिका सुधारित केली आहे. या उत्तरतालिकेतील उत्तरे अंतिम समजण्यात येतील. यासंदर्भात आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**उत्तरतालिका - KEY**

# MPSC

Notations:

1. Options shown in green color are correct.
2. Options shown in red color are incorrect.

# Group A

**Number of optional sections to be attempted: 0, Group Maximum duration : 0, Group Minimum duration : 60, Revisit allowed for view? : No, Revisit allowed for edit? : No, Break time: 0**

## Assistant Professor Marathi

**Section type : Online, Number of Questions to be attempted:100, Mandatory or Optional: Mandatory**

**Subsection : 1, Question Shuffling Allowed : Yes**

**Question id : 4403 Question Type : MCQ**

पळसदेवच्या शिलालेखाचा काळ कोणता?

**Options :**

1. सन 1060
2. सन 1157
3. सन 983
4. सन 1016

**Question id : 4404 Question Type : MCQ**

दिवे आगर येथील ताम्रपटाचा काल कोणता?

**Options :**

1. सन 1060
2. सन 1065
3. सन 1070

4. सन 1075

**Question id : 4405** **Question Type : MCQ**

''श्री चामुण्डेराजे करवियले, श्री गंगराजे सुत्ताले करवियले'' हा लेख कोणत्या शिलालेखात आढळतो?

**Options :**

1. दिवेआगर
2. अक्षी
3. श्रवणबेळगोळ
4. गरसोळी

**Question id : 4406** **Question Type : MCQ**

''विंध्याद्रिपासौनी दक्षणदिशेसी

कृष्णनदीपासौनी उत्तरेसी

झाडीमंडळापासौनी पश्चमेसी। कुंकणपर्यंत''

या महाराष्ट्राच्या सीमारेषा कोणी सांगितलेल्या आहेत?

**Options :**

1. नरेन्द्र
2. डिंभ कृष्णमुनी
3. महदंबा
4. म्हाइंभट

**Question id : 4407** **Question Type : MCQ**

'लीळाचरित्र 'व' श्रीज्ञानेश्वरी' हे ग्रंथ कोणाच्या काळात लिहिले गेले?

**Options :**

1. सिमुक
2. प्रवरसेन
3. पुलकेशी द्वितीय
4. रामदेव यादव

4.

**Question id : 4408** **Question Type : MCQ**

खालीलपैकी कोणता ग्रंथ महानुभाव संप्रदायाशी संबंधित नाही?

**Options :**

1. लीळाचरित्र
2. गुरुचरित्र
3. ज्ञानप्रबोध
4. दृष्टान्तपाठ

**Question id : 4409** **Question Type : MCQ**

"वैष्णवा घरी सर्व काळ । सदा झणझणिती टाळ

कण्याभाकरीचे खाणे । गाठी रामनाम नावे ।।" या पद्यपंक्ती कोणाच्या?

**Options :**

1. संत ज्ञानदेव
2. संत तुकाराम
3. संत निळोबा
4. संत नामदेव

**Question id : 4410** **Question Type : MCQ**

"लेकुरें उदंड झाली। तो ते लक्ष्मी निघोन गेली ।।

बापडी भिकेस लागली।" ही ओवी कोणाची?

**Options :**

1. संत रामदास
2. संत तुकडोजी महाराज
3. संत चोखामेळा
4. संत जनाबाई

**Question id : 4411** **Question Type : MCQ**

ज्ञानेश्वर एक की दोन? हा वाद कोणामध्ये झाला?

**Options :**

1. जोगमहाराज–रा.द. रानडे
2. पांगारकर ल.रा–स.के. नेऊरगावकर
3. भारदेबुवा–भिंगारकरबुवा
4. बा.अ.भिडे–नानामहाराज साखरे

**Question id : 4412** **Question Type : MCQ**

''ना राजेहो: आमुचेया कवीकुळा बोलु लागैल'' हे उद्‌गार कोणाचे?

**Options :**

1. वामनपंडित
2. म्हाइंभट
3. श्रीचक्रधर
4. कवी नरेंद्र

**Question id : 4413** **Question Type : MCQ**

''नजीबखान प्यादा होता तो फर्जी जाहला त्याने प्यादेमात केली, याप्रमाणे जाली हंकीकत सेवेसीं लिहिली असे'' हे निवेदन कोणत्या बखरीतील आहे?

**Options :**

1. महिकावतीची बखर
2. भाऊसाहेबांची बखर
3. पाणिपतची बखर
4. शाहू महाराजांची बखर

**Question id : 4414** **Question Type : MCQ**

''जसें तुम्ही आपल्या बाया सुपारीच्या खांडासारख्या तोंडात टाकून गिळून गेला, तोच बोध तुकोजी होळकरास करून उभयतां फौजबंदीने येण्याचें करावें, इंदुरीहून तमचें कच. त्याच दिवशी हत्तीचे पायांत अंद घालन तमची खात्री करीन.

तरच मल्हारजी होळरांची सून'' हे वाक्य कोणत्या बखरीतील आहे?

**Options :**

1. होळकरांची कैफियत
2. भाऊसाहेबांची बखर
3. पानिपतची बखर
4. सभासदाची बखर

**Question id : 4415** **Question Type : MCQ**

''यद्यपि सर्व विद्या अधीन, सर्वगुणसंपन्नता जाहली, श्रीकृपें राज्यही प्राप्त जालें, सर्वजण स्तुतिहि करितें, तथापि त्यावर न जावें, नित्यानित्य स्वकीय गुणदोष विचारणा करीतच असावी'' वरील वाक्य कोणत्या ग्रंथातील आहे?

**Options :**

1. लीळाचरित्र
2. स्मृतिस्थल
3. आज्ञापत्र
4. पेशव्यांची बखर

**Question id : 4416** **Question Type : MCQ**

पुढीलपैकी कोणता ग्रंथ म. फुले यांचा नाही?

**Options :**

1. गुलामगिरी
2. ब्राह्मणांचे कसब
3. इशारा
4. चाणक्य

**Question id : 4417** **Question Type : MCQ**

''निबंधमाले''चे कर्ते कोण?

**Options :**

Options :

1. गो.ग. आगरकर
2. विष्णुशास्त्री चिपळूणकर
3. लोकहितवादी
4. लो. टिळक

**Question id : 4418 Question Type : MCQ**

शांतता,शौर्य, व श्रीमंती ही कोणती नामे आहेत ?

**Options :**

1. भाववाचक नामे
2. सामान्य नामे
3. विशेष नामे
4. धातुसाधित नामे

**Question id : 4419 Question Type : MCQ**

जुलै 1927 मध्ये 'समाजस्वास्थ' मासिक कोणी सुरू केले?

**Options :**

1. दत्तात्रय गोपाळ कर्वे
2. चिंतामण श्रीधर कर्वे
3. रघुनाथ धोंडो कर्वे
4. दत्तात्रय नारायण कर्वे

**Question id : 4420 Question Type : MCQ**

भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या ग्रंथाचे कर्ते कोण?

**Options :**

1. म.फुले
2. डॉ आंबेडकर
3. महर्षी कर्वे
4. महर्षी शिंदे

**Question id : 4421** **Question Type : MCQ**

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी पुढीलपैकी कोणत्या क्षेत्रात भरीव कार्य केलेले आहे?

**Options :**

1. उद्योग
2. स्त्रीशिक्षण
3. क्रीडा
4. कृषी

**Question id : 4422** **Question Type : MCQ**

वृत्तपत्र व पत्रकार यांच्या जोडया लावा

| | |
|---|---|
| a) दर्पण | i) डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| b) प्रभाकर | ii) बाळशास्त्री जांभेकर |
| c) संदेश | iii) भाऊ महाजन |
| d) मूकनायक | iv) अ.ब. कोल्हटकर |
| | v) चिं. वि वैद्य |

**Options :**

1. (a)-ii,(b)-v,( c)-iii,(d)-i
2. (a)-v,(b)-iii,( c)-i,(d)-ii
3. (a)-ii,(b)-iii,( c)-iv,(d)-i
4. (a)-iv,(b)-ii,( c)-v,(d)-iii

**Question id : 4423** **Question Type : MCQ**

''जैसी हरलामाजि रत्नकिल। कि रत्नामाजि हिरा निल।

तैसा भाषाजि चोखल। भाषा मराठी।। ''अशी मराठी भाषेची महती कोणी वर्णिली आहे?

**Options :**

1. फा. थॉमस स्टिफन्स

2. संत ज्ञानेश्वर
3. म्हाइंभट
4. संत एकनाथ

**Question id : 4424 Question Type : MCQ**

'स्त्रीपुरुषतुलना' च्या कर्त्या कोण?

**Options :**

1. पंडिता रमाबाई
2. लक्ष्मीबाई टिळक
3. ताराबाई शिंदे
4. विभावरी शिरूरकर

**Question id : 4425 Question Type : MCQ**

1800 ते 1874 या कालखंडाला 'भाषांतरयुग' असे म्हटले जाते कारण या काळातील बहुतांश साहित्य भाषांतरित, रूपांतरित अथवा आधारित स्वरूपाचे होते.

**Options :**

1. वरील विधानातील पूर्वार्ध सत्य व उत्तरार्ध असत्य आहे.
2. वरील विधान पूर्णतः चुकीचे आहे.
3. वरील विधानातील पूर्वार्ध असत्य व उत्तरार्ध सत्य आहे.
4. वरील विधानातील पूर्वार्ध व उत्तरार्ध सत्य आहेत.

**Question id : 4426 Question Type : MCQ**

ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा पाया कोणी घातला?

**Options :**

1. योकोबसन
2. सर विल्यम जोन्स
3. रेने वेलेक
4. देरिदा

**Question id : 4427 Question Type : MCQ**

Question id : 4427 Question Type : MCQ

मराठी, गुजराती, बंगाली व हिन्दी या भाषा कोणत्या भाषा कुळातील आहेत?

**Options :**

1. द्राविडी
2. ऑस्ट्रो आशिया
3. इंडोयुरोपियन
4. सिनो तिबेटियन

**Question id : 4428 Question Type : MCQ**

झाड, धोंडा, डोळा, डोके हे शब्द कोणत्या प्रकारचे आहेत?

**Options :**

1. परभाषीय
2. तद्‌भव
3. तत्सम
4. देशी

**Question id : 4429 Question Type : MCQ**

पुढीलपैकी कोणता शब्द शुद्ध आहे?

**Options :**

1. अल्पसंख्याक
2. अल्पसंख्यांक
3. अल्पसंख्यंक
4. अल्पसख्येक

**Question id : 4430 Question Type : MCQ**

भाषेचा समाजातील प्रत्यक्ष वापराचा अभ्यास करणा–या भाषाविज्ञानाच्या शाखेस काय म्हणतात?

**Options :**

1. ऐतिहासिक भाषाविज्ञान

1.

2. समाज भाषाविज्ञान

3. वर्णनात्मक भाषाविज्ञान

4. तौलनिक भाषाविज्ञान

**Question id : 4431** **Question Type : MCQ**

वैद्य–गुणे वाद कशाच्या संदर्भात आहे?

**Options :**

1. मराठी लोकसाहित्य

2. मराठी वर्णमाला

3. मराठीची उत्पत्ती

4. दोन ज्ञानदेव

**Question id : 4432** **Question Type : MCQ**

जिभेने वरच्या दातांना स्पर्श करून जी व्यंजने उच्चारली जातात त्यांना काय म्हणतात?

**Options :**

1. ओष्ठय व्यंजने

2. दंत्य व्यंजने

3. तालव्य व्यंजने

4. कंठय व्यंजने

**Question id : 4433** **Question Type : MCQ**

'मुलाने आंबा खाल्ला' या वाक्यात कोणता प्रयोग आहे?

**Options :**

1. भावे प्रयोग

2. कर्तरिप्रयोग

3. कर्मणि प्रयोग

4. भावे –कर्तरि प्रयोग

**Question id : 4434** **Question Type : MCQ**

आजन्म, प्रतिदिन, यथाक्रम ही कोणत्या समासाची उदाहरणे आहे?

**Options :**

1. तत्पुरूष
2. द्वंद
3. बहुव्रीही
4. अव्ययीभाव

**Question id : 4435** **Question Type : MCQ**

'मी रोज सकाळी पहाटे उठतो व एक तासभर शाळेचा अभ्यास करतो.' हे कोणत्या प्रकारचे वाक्य आहे.

**Options :**

1. संयुक्त वाक्य
2. प्रश्नार्थी वाक्य
3. उद्‌गारार्थी वाक्य
4. गौण वाक्य

**Question id : 4436** **Question Type : MCQ**

हरळ, ओटा, परडी, बांबू, तुंबा हे कोणत्या भाषेतून मराठीत स्थिरावलेले शब्द आहेत?

**Options :**

1. अरबी
2. फारसी
3. कन्नड
4. गुजराती

**Question id : 4437** **Question Type : MCQ**

पुढील केवलप्रयोगी अव्ययांतून कोणती भावना व्यक्त होते अरेरे, अगाई, अयाई, आई ग, हाय हाय.

**Options :**

1. आश्चर्य
2. शोक
3. प्रशंसा
4. हर्ष

**Question id : 4438** **Question Type : MCQ**

''गणपत वाणी विडी पिताना, चावायचा नुसतीच काडी, म्हणायचा अन मनाशीच की, या जागेवर बांधिन माडी'' यात कोणता अलंकार आहे.

**Options :**

1. रूपक
2. उत्प्रेक्षा
3. अतिशयोक्ती
4. स्वभावोक्ती

**Question id : 4439** **Question Type : MCQ**

पुढील इंग्रजी–मराठी पारिभाषिक शब्दांच्या जोडया लावा

| | |
|---|---|
| a) Audit | i) प्रभारी |
| b) In-Charge | ii) लेखापरीक्षण |
| c) Hard-cash | iii) निविदा |
| d) Tender | iv) रोकड |
| | v) गुणात्मक |

**Options :**

1. (a)-ii,(b)-i,( c)-iv,(d)-iii
2. (a)-i,(b)-iii,( c)-ii,(d)-iv
3. (a)-ii,(b)-iv,( c)-iii,(d)-i
4. (a)-i,(b)-v,( c)-iv,(d)-ii

4. (a)-i,(b)-v,( c)-iv,(d)-ii

**Question id : 4440** **Question Type : MCQ**

तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे काय?

**Options :**

1. साहित्याची इतर मानवी आविष्कार क्षेत्रांशी केलेली तुलना.
2. वंश, काळ आणि परिस्थिती यांच्या अनुषंगाने केलेला साहित्याभ्यास.
3. साधर्म्य, वैधर्म्य, प्रभाव आणि प्रभाव या चार अंगांनी साहित्याचा केलेला अभ्यास.
4. साहित्यनिर्मितीस साहयभूत होणा–या विविध घटकांचा घेतलेला मागोवा.

**Question id : 4441** **Question Type : MCQ**

'तौलनिक साहित्य: नवे सिद्धांत आणि उपयोजन' या ग्रंथाचे कर्ते कोण?

**Options :**

1. गंगाधर पाटील
2. आनंद पाटील
3. वसंत बापट
4. वसंत पाटणकर

**Question id : 4442** **Question Type : MCQ**

'द नेम ॲन्ड नेचर ऑफ कम्पॅरिटिव्ह लिटरेचर' हा प्रदीर्घ लेख कोणी लिहिला?

**Options :**

1. कार्लमार्क्स
2. फ्राइड
3. रेने वेलेक
4. देरिदा

**Question id : 4443** **Question Type : MCQ**

'सॉलबेलो' या नोबेल पारितोषिक विजेत्या अमेरिकन लेखकाच्या 'हरझॉग' या कादंबरीचा स्वैर अनुवाद मराठीत कोणी केला?

**Options :**

कविता महाजन

1. [illegible]
2. आशा बगे
3. जोत्स्ना देवधर
4. छाया महाजन

**Question id : 4444** **Question Type : MCQ**

मूळ कन्नड भाषेत असलेल्या गिरीश कर्नाड यांच्या आत्मचरित्राचा ‘खेळता खेळता आयुष्य’ असा मराठीत अनुवाद कोणी केला?

**Options :**

1. उमा कुलकर्णी
2. मेधा सिधये
3. नीलीमा गुंडी
4. शोभा देशमुख

**Question id : 4445** **Question Type : MCQ**

वोलॉशिनॉव (Volosinav) यांचा ‘Marxim and the Philosopy of language’ हा ग्रंथ 1979 मध्ये रशियनमध्ये प्रथम प्रकाशित झाला, वोलॉशिनॉव हा बाख्तिनचा सहकारी होता.

**Options :**

1. वरील विधानातील पूर्वार्ध चूक व उत्तरार्ध बरोबर आहे.
2. वरील विधानातील पूर्वार्ध बरोबर व उत्तरार्ध चूक आहे.
3. वरील विधान पूर्ण चुकीचे आहे.
4. वरील विधानातील पूर्वार्ध व उत्तरार्ध बरोबर आहेत.

**Question id : 4446** **Question Type : MCQ**

सामान्यपणे मराठी व्याकरणात शब्दांच्या किती जाती मानलेल्या आहेत?

**Options :**

1. पाच
2. आठ

3. सहा

4. चार

**Question id : 4447** **Question Type : MCQ**

लालजी पेंडसे, प्रभाकर पाध्ये, के. नारायण काळे, वि.ह.कुलकर्णी, अनंत काणेकर ही नावे कोणत्या समीक्षा प्रकारांशी जोडलेली आहेत?

**Options :**

1. आदिबंधात्मक समीक्षा

2. मानसशास्त्रीय समीक्षा

3. मार्क्सवादी समीक्षा

4. रूपवादी समीक्षा

**Question id : 4448** **Question Type : MCQ**

प्रतिभेला वेडाची बहीण कोणी म्हटले आहे?

**Options :**

1. डॉ. जॉन्सन

2. लोंब्रोसा

3. प्रिस्कॉट

4. फ्राईड

**Question id : 4449** **Question Type : MCQ**

स्वेद, रोमांच, स्वरभेद, कंप, वैवर्ण्य, अश्रू, स्तंभ, प्रलय हे काय आहेत?

**Options :**

1. अष्टसात्विक भाव

2. रस

3. अलंकार

4. काव्यलक्षणे

**Question id : 4450** **Question Type : MCQ**

'विरेचन' (Katharisis) ही संकल्पना कोणी मांडलेली आहे?

**Options :**

1. टॉलस्टॉय
2. शॉ वॉल्टर
3. शॉपेनहोअर
4. ॲरिस्टॉटल

**Question id : 4451 Question Type : MCQ**

विसाव्या शतकाच्या प्रारंभी आधुनिक भाषाविज्ञानाच्या मुलभूत तत्वांची मांडणी कोणी केली?

**Options :**

1. सिगमंड फ्राइड
2. एमिल डुर्कहाइम
3. फेर्दिना द सोस्यूर
4. व्हर्नर

**Question id : 4452 Question Type : MCQ**

'सौंदर्यशास्त्रीय ग्रंथ' व सौंदर्य मीमांसक' यांच्या जोडया लावा.

| | |
|---|---|
| a) सौंदर्यमीमांसा | i) प्रभाकर पाध्ये |
| b) सौंदर्य आणि साहित्य | ii) शरत्चंद्र मुक्तिबोध |
| c) सौंदर्यानुभव | iii) रा.भा.पाटणकर |
| d) सृष्टी सौंदर्य आणि साहित्यमूल्य | iv) बा.सी. मर्ढेकर |

**Options :**

1. (a)-iii,(b)-iv,( c)-i,(d)-ii
2. (a)-i,(b)-ii,( c)-iii,(d)-iv
3. (a)-ii,(b)-iii,( c)-i,(d)-iv
4. (a)-ii,(b)-iv,( c)-i,(d)-iii

**Question id : 4453 Question Type : MCQ**

पुढील काव्य प्रकार व ते ज्या मूळ भाषांतून मराठीत आले त्यांच्या जोडया लावा.

| | |
|---|---|
| a) महाकाव्य | i) इंग्रजी |
| b) सुनीत | ii) जपानी |
| c) गझल | iii) फार्सी |
| d) हायक | iv) संस्कत |

Options :

1. (a)-i,(b)-iii,( c)-ii,(d)-iv
2. (a)-iv,(b)-i,( c)-iii,(d)-ii
3. (a)-iii,(b)-ii,( c)-iv,(d)-i
4. (a)-ii,(b)-iv,( c)-i,(d)-iii

**Question id : 4454     Question Type : MCQ**

डिसेंबर, 1986 साली ‘दहावी लोकसाहित्य परिषद’ महाराष्ट्रात कोणत्या ठिकाणी आयोजित केली गेली होती?

Options :

1. पुणे
2. राहुरी
3. मुंबई
4. अहमदनगर

**Question id : 4455     Question Type : MCQ**

मराठीत लोकतत्त्वीय अभ्यासाची नवी दृष्टी आणण्याचे श्रेय कुणाला दिले जाते?

Options :

1. डॉ. गंगाधर मोरजे
2. साने गुरुजी
3. डॉ. रा. चिं. ढेरे
4. डॉ. शरद व्यवहारे

**Question id : 4456     Question Type : MCQ**

पुढील ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोडया लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | लोकसाहित्याचे अंत:प्रवाह | (i) | डॉ. रा. चिं. ढेरे |
| (b) | लोकसाहित्याची रूपरेखा | (ii) | डॉ. विश्वनाथ शिंदे |
| (c) | संतसाहित्य आणि लोकसाहित्य | (iii) | दुर्गा भागवत |
| (d) | लोकसाहित्यमीमांसा भाग–1 | (iv) | प्रभाकर मांडे |

**Options :**

1. (a)-iv,(b)-iii,( c)-i,(d)-ii
2. (a)-iv,(b)-iii,( c)-ii,(d)-i
3. (a)-iii,(b)-iv,( c)-i,(d)-ii
4. (a)-i,(b)-ii,( c)-iv,(d)-iii

**Question id : 4457 Question Type : MCQ**

''कारल्याचा वेल लावं गं सुनबाई

मगं जा तू तुपल्या माहेरा

कारल्याचं आळं लावलं वं सासूबाई

बंधू आल्याती न्यायला

मी जाते मपल्या माहेरा'' हा संवाद कोणात आहे?

**Options :**

1. आई–मुलगी
2. सासू–सून
3. आत्या–मावशी
4. जाऊ–नणंद

**Question id : 4458 Question Type : MCQ**

पुढील लोकगीतातून कोणत्या शारीरिक व्यंगावर विनोदनिर्मिती केलेली आहे–

''बाप म्हणतो बैल घेऊन मळयात जा पोरा।

मुलगा म्हणतो धोतर कसं शिवू नाही सुईदोरा।

गुराखी म्हणतो, पावन कोठून आली तुमची गाडी।
गाडीवान म्हणतो, हजार रूपयाला घेतली बैलजोडी।''

**Options :**

1. मुकेपणा
2. लंगडेपणा
3. बहिरेपणा
4. आंधळेपणा

**Question id : 4459** **Question Type : MCQ**

स्त्रीवादी समीक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेले ग्रंथ व ग्रंथकारांच्या जोडया लावा. ( Question Cancelled)

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | सिमन दि बुव्हा | (i) | द फिमेल यूनच |
| (b) | बेटी फ्रिडन | (ii) | सेक्स्युअल पॉलिटिक्स |
| (c) | केट मिलेट | (iii) | सेकंड सेक्स |
| (d) | जर्मेन ग्रीअर | (iv) | द फेमिनिमिस्टिक |

**Options :**

1. (a)-iv,(b)-i,( c)-iii,(d)-ii
2. (a)-iii,(b)-i,( c)-ii,(d)-iv
3. (a)-iv,(b)-iii,( c)-i,(d)-ii
4. (a)-iii,(b)-iv,( c)-i,(d)-ii

**Question id : 4460** **Question Type : MCQ**

''विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कितीक वर्षांमागे रचले असताही केवळ पाठांतराच्या बळावर पिढयानपिढया आपल्या नवनवोन्मेषशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय. ''हे उदगार कोणाचे ?

**Options :**

.

1. दुर्गा भागवत
2. डॉ. सरोजिनी बाबर
3. डॉ. रा. चिं. ढेरे
4. प्रभाकर मांडे

**Question id : 4461 Question Type : MCQ**

सुनंदा कुळकर्णी किंवा सुनंदा बलरामन हे कोणत्या स्त्रीवादी लेखिकेचे मूळ नाव आहे?

**Options :**

1. विद्या बाळ
2. आशा बगे
3. सानिया
4. मेघना पेठे

**Question id : 4462 Question Type : MCQ**

नक्षलवादासारखी ज्वलंत समस्या रंगभूमीवर प्रथम आणणारी एकांकिका 'स्पेशल ॲक्शन प्लॅन' चे लेखक कोण?

**Options :**

1. विनोद मोरांडे
2. व्ही. आर. पाकलकर
3. सुनील कोडपे
4. विनायक तुमराम

**Question id : 4463 Question Type : MCQ**

आदिवासी कवी व काव्यसंग्रहाच्या जोडया लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | उत्तमराव धोंगडे | (i) | गोधड |
| (b) | वाहरू सोनवणे | (ii) | गोंडवन पेटले आहे |
| (c) | विनायक तुमराम | (iii) | उलगुलान |

(d) भुजंग मेश्राम (iv) वनवासी

**Options :**

1. (a)-i,(b)-iv,( c)-ii,(d)-iii
2. (a)-iv,(b)-i,( c)-ii,(d)-iii
3. (a)-ii,(b)-iii,( c)-iv,(d)-i
4. (a)-i,(b)-iv,( c)-iii,(d)-ii

**Question id : 4464 Question Type : MCQ**

“वाटेन–जातेस तर समद्या डोयाले आग लागन

राणे! तुझ्यावर नजर समद्या सुधारलेल्या बाप्यायची!

म्हणून म्हणते तू रातराणी होवू नगं।

व्हशील तं पयसाची लाल तांबडी आग व्हय!

नाय तं बिब्याची फुल व्हय! “

या पद्यपंक्ती कोणाच्या?

**Options :**

1. उषाकिरण आत्राम
2. सौ कुसुम आलाम
3. कविता आत्राम
4. वामन शेळमाके

**Question id : 4465 Question Type : MCQ**

पुढीलपैकी कोणता काव्यसंग्रह नामदेव ढसाळ यांचा नाही?

**Options :**

1. गोलपिठा
2. मूर्ख म्हाता–याने डोंगर हलवले
3. छावणी हलते आहे
4. खेळ

**Question id : 4466 Question Type : MCQ**

पुढीलपैकी दया पवारांचे आत्मकथन कोणते आहे?

**Options :**

1. उचल्या
2. उपरा
3. अक्करमाशी
4. बलुतं

**Question id : 4467**     **Question Type : MCQ**

पुढीलपैकी कोणती व्यक्ती दलित लेखिका नाही?

**Options :**

1. जनाबाई गि–हे
2. गौरी देशपांडे
3. उर्मिला पवार
4. कुमुद पावडे

**Question id : 4468**     **Question Type : MCQ**

''मानवी प्रगतीतं सर्वात मागे राहिलेला, रेटलेला सामाजिक वर्ग म्हणजे दलित'' ही व्याख्या कुणी केली?

**Options :**

1. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
2. डॉ. प्रभाकर मांडे
3. डॉ. भालचंद्र फडके
4. म. ना. वानखेडे

**Question id : 4469**     **Question Type : MCQ**

'गावपांढरी' या महेश मोरे यांच्या कादंबरीचा मुख्य विषय काय आहे?

**Options :**

1. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार

ऊस उत्पादक शेतक–यांचे आंदोलन

2.

3. रझाकारांविरुद्‌ध संघर्ष

4. शेतक–यांच्या आत्महत्या

**Question id : 4470 Question Type : MCQ**

खालीलपैकी कोणती कादंबरी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची आहे?

**Options :**

1. सावित्री
2. जोगीण
3. भंडारभोग
4. गांधारीचे डोळे

**Question id : 4471 Question Type : MCQ**

पुढील कवी/कवयित्री व काव्यसंग्रहाच्या जोडया लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | कल्पना दुधाळ | (i) | अंधाराचा माझा गाव |
| (b) | कैलास दौंड | (ii) | सिझर कर म्हणते माती |
| (c) | पृथ्वीराज तौर | (iii) | जंगल झडी |
| (d) | उत्तम कोळगांवकर | (iv) | गाव आणि शहराच्या मधोमध |

**Options :**

1. (a)-ii,(b)-i,( c)-iii,(d)-iv
2. (a)-ii,(b)-i,( c)-iv,(d)-iii
3. (a)-iv,(b)-i,( c)-iii,(d)-ii
4. (a)-iii,(b)-iv,( c)-i,(d)-ii

**Question id : 4472 Question Type : MCQ**

"आकडा टाकून घेतलेली लाईट, डिम्म झाली की बाप जाऊन, आकडयाच्या तारेवर चढलेलं कार्बन साफ कराचया, भग लगेच लाईट चमकायची ......." या ओळी कोणाच्या?

**Options :**

1. बालाजी मदन इंगळे

2. केशव सखाराम देशमुख

3. श्रीकांत देशमुख

4. प्रकाश किनगांवकर

**Question id : 4473 Question Type : MCQ**

'निरंतर' या टोपणनावाने काव्यलेखन करणारे कवी कोण?

**Options :**

1. सतीश पगारे
2. रॉक कार्व्हॉ
3. इनास कून
4. सी. बी. दोडती

**Question id : 4474 Question Type : MCQ**

'सुंदरा मनामधिं भरलि', 'ही सांग सखे सुंदरी' या लावण्या कोणाच्या?

**Options :**

1. होनाजी बाळा
2. सगन भाऊ
3. परशराम
4. रामजोशी

**Question id : 4475 Question Type : MCQ**

श्री द. भि. कुलकर्णी यांची मुलाखत घेताना कोणत्या क्षेत्रातील प्रश्न विचारणे उचित ठरेल?

**Options :**

1. क्रीडा
2. साहित्य
3. क्रिकेट
4. राजकारण

**Question id : 4476 Question Type : MCQ**

जाहिरात प्रभावी होण्यासाठी पुढीलपैकी कोणत्या घटकास सर्वाधिक महत्त्व

[illegible]

आहे.

**Options :**

1. स्वस्त मालाची खात्री
2. अन्य मालाची बदनामी
3. अलंकारपूर्ण भाषाशैली
4. सुटसुटीत व आकर्षक भाषा

**Question id : 4477** **Question Type : MCQ**

'An extension of Print Media' या अरविंद गोखले यांच्या लेखानुसार कोणते मराठी वृत्तपत्र सर्वप्रथम इंटरनेटवर गेल्याची नोंद आहे?

**Options :**

1. केसरी
2. सकाळ
3. लोकसत्ता
4. पुण्यनगरी

**Question id : 4478** **Question Type : MCQ**

'भगीरथ प्रयत्न करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ काय आहे?

**Options :**

1. गंगा पूजा करणे
2. अतिशय प्रयत्न करणे
3. प्रयत्न न करणे
4. प्रयत्नात कसूर करणे

**Question id : 4479** **Question Type : MCQ**

'रूपक' ही कोणत्या माध्यमाची देणगी आहे?

**Options :**

1. वृत्तपत्र
2. चित्रपट
3. श्राव्यमाध्यम
4. दूरदर्शन

**Question id : 4480** **Question Type : MCQ**

‘पीटीआय स्टोरी’ चे लेखक राघवन यांनी कोणाचा उल्लेख 'Father of Indian Press' (भारतीय वृत्तपत्रांचे जनक) असा केला आहे.

**Options :**

1. राजा राममोहन रॉय
2. लाला लजपत राय
3. बाळशास्त्री जांभेकर
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**Question id : 4481** **Question Type : MCQ**

‘आजानुबाहु’ शब्दाचा अर्थ काय?

**Options :**

1. ज्याचे हात छोटे आहेत
2. ज्याचे हात गुडघ्यापर्यंत लांब आहेत
3. ज्याला एकच हात आहे
4. जो दानधर्म करतो तो

**Question id : 4482** **Question Type : MCQ**

प्रबोधनपर साहित्य व साहित्यिक यांच्या जोडया लावा

(a) समता (i) साळुंखे आ. ह.

| | | | |
|---|---|---|---|
| (b) | चावाक | (ii) | ग. बा. सरदार |
| (c) | प्रबोधनाच्या पाऊलखुणा | (iii) | जनार्दन वाघमारे |
| (d) | महात्मा फुले | (iv) | रावसाहेब कसबे |
| | | (v) | हरी नरके |

**Options :**

1. (a)-iii,(b)-v,( c)-i,(d)-ii
2. (a)-ii,(b)-iv,( c)-v,(d)-i
3. (a)-iv,(b)-ii,( c)-i,(d)-v
4. (a)-iv,(b)-i,( c)-ii,(d)-v

**Question id : 4483** **Question Type : MCQ**

नाटक व नाटककरांच्या जोडया लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | भावबंधन | (i) | श्री. वि. वर्तक |
| (b) | तोतयाचे बंड | (ii) | प्र. के. अत्रे |
| (c) | आंधळयाची शाळा | (iii) | रा. ग. गडकरी |
| (d) | साष्टांग नमस्कार | (iv) | न. चिं. केळकर |

**Options :**

1. (a)-iii,(b)-iv,( c)-i,(d)-ii
2. (a)-iii,(b)-iv,( c)-ii,(d)-i
3. (a)-i,(b)-ii,( c)-iii,(d)-iv
4. (a)-iv,(b)-iii,( c)-i,(d)-ii

**Question id : 4484** **Question Type : MCQ**

शाहीर कवी व त्यांचे मूळ गाव यांच्या जोडया लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | प्रभाकर | (i) | सोलापूर |
| (b) | रामजोशी | (ii) | जेजुरी |
| (c) | सगन भाऊ | (iii) | संगमनेर |
| (d) | अनंतफंदी | (iv) | मरूड |

Options :

1. (a)-i,(b)-iii,( c)-iv,(d)-ii
2. (a)-ii,(b)-iii,( c)-i,(d)-iv
3. (a)-iv,(b)-i,( c)-ii,(d)-iii
4. (a)-iv,(b)-ii,( c)-i,(d)-iii

**Question id : 4485 Question Type : MCQ**

'भावीण' कादंबरीचे कादंबरीकार कोण ?

Options :

1. जयवंत दळवी
2. बा.भ.बोरकर
3. ना.सी. फडके
4. वि.स. खांडेकर

**Question id : 4486 Question Type : MCQ**

'आर्याभारत' 'केकावली', 'मंत्रभागवत' 'मंत्ररामायण' या काव्यरचना कोणाच्या?

Options :

1. अमृतराय
2. श्रीधर
3. वामन पंडित
4. मोरोपंत

**Question id : 4487 Question Type : MCQ**

'कोल्हा काकडीला राजी' या म्हणीचा अर्थ काय आहे ?

Options :

1. क्षुद्र माणसे क्षुद्र गोष्टींनीही खूष होतात.
2. कोल्हयाला काकडी आवडते.
3. क्षुद्र गोष्टींनी कोल्हा खूष होतो.
4. क्षुद्र माणसे क्षुद्र गोष्टींनीही नाराज होतात.

**Question id : 4488**     **Question Type : MCQ**

सासवड येथे आयोजित 87व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते?

**Options :**

1. द. भि. कुलकर्णी
2. नागनाथ कोत्तापल्ले
3. वसंत आबाजी डहाके
4. फ. मु. शिंदे

**Question id : 4489**     **Question Type : MCQ**

पुढीलपैकी कोणत्या साहित्यिकास ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला नाही?

**Options :**

1. विंदा करंदीकर
2. वि. स. खांडेकर
3. बा. भ. बोरकर
4. कुसुमाग्रज

**Question id : 4490**     **Question Type : MCQ**

इ. स. 2013 चा साहित्य अकादमी पुरस्कार पुढीलपैकी कोणत्या पुस्तकास मिळालेला आहे ?

**Options :**

1. भूमी
2. वाचणा–यांची रोजनिशी
3. भिजकी वही
4. वा–याने हलते पान

**Question id : 4491**     **Question Type : MCQ**

पुढीलपैकी कोणत्या गटातील नाटके तेंडूलकरांची आहेत?

**Options :**

1. गिधाडे., सखाराम बाईंडर, शांतता! कोर्ट चालू आहे.
2. महानिर्वाण, घोटभर पाणी, छिन्न
3. अवध्य, षड्ज, वासनाकांड
4. गार्बो, उध्वस्त धर्मशाळा, पार्टी.

**Question id : 4492     Question Type : MCQ**

वि. स. खांडेकर मराठीतील श्रेष्ठ कादंबरीकार आहेत. त्यांच्या अनेक काव्यसंग्रहांनी मराठी काव्यसाहित्याचे दालन समृद्ध केले आहे?

**Options :**

1. वरील विधानातील पूर्वार्ध व उत्तरार्ध बरोबर आहेत
2. वरील विधानातील पूर्वार्ध व उत्तरार्ध चूक आहेत
3. वरील विधानातील पूर्वार्ध चूक तर उत्तरार्ध बराबेर आहे
4. वरील विधानाचा पूर्वार्ध बरोबर व उत्तरार्ध चूक आहे

**Question id : 4493     Question Type : MCQ**

पुढीलपैकी कोणता काल. **क्रम** बरोबर आहे ?

**Options :**

1. सुशीलेचा देव, अल्ला हो अकबर, पण लक्षात कोण घेतो ?,ययाति.
2. अल्ला हो अकबर ,पण लक्षात कोण घेतो ?,ययाति, सुशीलेचा देव.
3. पण लक्षात कोण घेतो ?,अल्ला हो अकबर,सुशीलेचा देव,ययाति.
4. ययाति, पण लक्षात कोण घेतो?, सुशीलेचा देव, अल्ला हो अकबर.

**Question id : 4494     Question Type : MCQ**

'Arts and Man' व 'Two Lectures on An Asthetic of Literature' या ग्रंथाचे कर्ते कोण?

**Options :**

1. वा. ल. कुळकर्णी
2. बा. सी. मर्ढेकर

3. द. क. कळकर

4. रा. शं. वाळिंबे

**Question id : 4495**     **Question Type : MCQ**

पुढीपैकी कुणी महानुभाव वाङ्मयाचे संशोधन व संपादन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे?

**Options :**

1. वि. भि. कोलते

2. म. वा. धोंड

3. रा. चिं. ढेरे

4. श्री. ना. बनहट्टी

**Question id : 4496**     **Question Type : MCQ**

'अस्पृश्याची डायरी' व 'गावकुसाबाहेरची वस्ती' या दलित कादंब—यांचे कादंबरीकार कोण आहेत?

**Options :**

1. सिद्धार्थ रामटेके

2. मधु मंगेश कर्णिक

3. जी. के. ऐनापुरे

4. सदा क—हाडे

**Question id : 4497**     **Question Type : MCQ**

'राष्ट्रीय साहित्य', 'विश्वसाहित्य' 'सर्वसमावेशक साहित्य' प्रभाव, 'प्रभव' या संकल्पना प्रामुख्याने कशाच्या संदर्भात वापरल्या जातात?

**Options :**

1. दलित साहित्य

2. तौलनिक साहित्य

3. ग्रामीण साहित्य

4. लोकसाहित्य

**Question id : 4498** **Question Type : MCQ**

तुलू, कोडगू, कोटा, खोंड, राजमहाली, कैकाडी या भाषा कोणत्या वर्गात मोडल्या जातात?

**Options :**

1. ऑस्ट्रिक
2. सायनो–तिबेटी
3. द्राविडी
4. पहाडी

**Question id : 4499** **Question Type : MCQ**

'अग्नी' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता आहे?

**Options :**

1. अनल
2. सुधा
3. तुरंग
4. सोम

**Question id : 4500** **Question Type : MCQ**

"आम्ही गनीम, मोगलांचें अन्न–पाणी बंद करावें. तें न करतां आमचाच आटा बंद जाला. तेव्हां सर्व उपाय राहिला. देशाहून कोणी कुमक करावी, तेही आस्था राहिली. समागमें मुलें मनुष्ये आणिलीं एवढे वाईट केलें. असो. आप मेला जग बुडाला. ज्याचें दैवीं असेल तें घडेल." हा मराठी भाषेचा कोणत्या काळातील नमुना आहे?

**Options :**

1. यादवकालीन
2. बहामनीकालीन
3. आधुनिक

3.

4. पेशवेकालीन

**Question id : 4501     Question Type : MCQ**

''संत साहित्याने सामान्यजनांना निवृत्तिमार्गाने नेऊन महाराष्ट्राचे नुकसान केले'' अशी टीका कोणी केली आहे?

**Options :**

1. शं. गो. तुळपुळे
2. वि. का. राजवाडे
3. वि. ल. भावे
4. प्र. न. जोशी

**Question id : 4502     Question Type : MCQ**

स,ला,ते,ने,ए,शी,चा,ची,चे,ऊन,हून यांना काय म्हणतात?

**Options :**

1. विभक्ती
2. शब्दशक्ती
3. प्रत्यय
4. उपसर्ग